**औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद**

**दिनांक १८-१०-२०११ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

मंगळवार दिनाक १८-१०-२०११ रोजी (कार्य.प.क्र.२९) मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.४.२५ वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.पुरूषोत्तम भापकर भा.प्र.से. नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
२. स.स.श्री. शिंदे राजु रामराव
३. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
४. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
५. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
६. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
७. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
८. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
९. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
१०. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
११. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
१२. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
१३. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे
१४. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१५. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१६. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१७. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१८. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१९. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
२०. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
२१. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२२. स.स.सौ.उर्मिला नितीन चित्ते
२३. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२४. स.स.श्री.बोराडे रामदास काशीनाथ
२५. स.स.श्री.घोडिले आनंद राधाकिसन

२६. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२७. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२८. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२९. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
३०. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी
३१. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
३२. स.स.श्रीमती जरीना म.जावेद
३३. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
३४. स.स.श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग
३५. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
३६. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३७. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३८. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३९. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
४०. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
४१. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
४२. स.स.श्री.मुजीबखान मीर आलमखान
४३. स.स.श्री.अफसरखान यासीन खान
४४. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
४५. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
४६. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४७. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
४८. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४९. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
५०. स.स.डॉ.खान जफर अहेमद
५१. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
५२. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
५३. स.स.श्री. आगा खान मिया खान
५४. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
५५. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान

५६. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
५७. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
५८. स.स.श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत
५९. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
६०. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
६१. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा
६२. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
६३. स.स.श्रीमती शिंदे सत्यभामा दामोधर
६४. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
६५. स.स.श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
६६. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
६७. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान
६८. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
६९. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७०. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
७१. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
७२. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
७३. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
७४. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
७५. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम
७६. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७७. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
७८. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
७९. स.स.श्री.जैन विकास रतनलाल
८०. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
८१. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
८२. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन
८३. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश
८४. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव

०२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद
०३. स.स.श्रीमती पाटील रेखा दिनकरराव
०४. स.स.श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया

श्री.त्रिंबक तुपे :विषय पत्रिका घेण्यात यावी.

**विषय क्र. ४८२ :**

दिनांक ३०.०५.२०११ (का.प.क्र.२१ ) व दिनांक ०७.०६.२०११ (का.प.क्र.२२) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

संवाद :

श्री.गिरजाराम हळनोर :इतिवृत्त कायम करण्याचा विषय आहे इतिवृत्त बरोबर आहे मंजूर करण्यात यावे.

याच वेळी मा.महापौर डायस समोर अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.राजू शिंदे :विषय क्र. ४८२ घेण्यात यावा.

श्री.गिरजाराम हळनोर :विषय पत्रिकेला सुरूवात केलेली आहे विषय पुकारावे.

मा.महापौर :विषय मंजूर

**ठराव :**

दिनांक ३०.०५.२०११ (का.प.क्र.२१ ) व दिनांक ०७.०६.२०११ (का.प.क्र.२२) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४८३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर विधी सल्लागार ०१ पद मंजुर असून ते भरण्यात आलेले आहे. विधी विभाग हा महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने महत्वाचा विभाग आहे. कारण महानगरपालिकेविरुध्द न्यायालयीन प्रकरणांत दिवसेंदिवस वाढ होत आहे. अशा वेळी महानगरपालिकेची बाजू प्रभावीपणे मांडली जाणे गरजेचे आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेविरुध्द विविध न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे तातडीने निकाली काढणे, कायदेविषयक सल्ला देणे, महानगरपालिकेच्या खुल्या जागा व रस्त्यावरील अतिक्रमणे, भूसंपादन आरक्षणाची प्रकरणे, आस्थापना विषयक प्रकरणे, बी.ओ.टी तत्वावरील प्रकरणे इत्यादि प्रभावीपणे हाताळण्यासाठी विधी विभाग सक्षम करणे आवश्यक आहे.

करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (४) अन्वये महानगरपालिका आस्थापनेवर विधी व कामगार या विभागांसाठी श्रेणी-१ संवर्गातील 'उपआयुक्त (विधी)' हे नवीन पद वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ५,४००/- मध्ये मंजूर करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविणे, (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाचा विधी शाखेचा पदवीधर. पदव्युत्तर पदवीधारकास प्राधान्य (एल.एल.एम) (ब) जिल्हा न्यायालयातील स्वंतत्र वकीलीचा सात वर्षाचा विशेषतः महानगरपालिका अधिनियम, कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट, प्रशासकीय व कामगार विषयक अधिनियमाच्या कामाचा अनुभव. ही शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारामधून नामनिर्देशनाने अथवा शासनाकडून प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी 'उपआयुक्त (विधी)' हे नवीन पद निर्माण करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

संवाद :

श्री.बाळासाहेब मुंडे :हा विषय नामंजूर करावा.

श्री.त्रिंबक तुपे :हा विषय नामंजूर करावा.

श्री.सुशिल खेडकर :हा विषय नामंजूर करण्यात यावे

यावेळी हा विषय नामंजूर करावा अशी मागणी होते.

मा.महापौर :स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे शहराच्या विकासासाठी आपण निर्णय घेत असतो.सध्या महापालिकेत उपआयुक्ताची ४ पदे आहेत त्यापैकी दोन उपआयुक्त कार्यरत आहे दोन पदे रिक्त आहे त्यामुळे प्रशासनाने दोन रिक्त पदावर तात्काळ अनुभवी उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी नियुक्त करण्याकरीता प्रयत्न करावे ४ उपआयुक्त पदे असतांना दोन उपआयुक्तांवर सध्या महापालिकेचा कारभार चालू आहे रिक्त पदावर उपआयुक्त पद नेमण्याचा विचार व्हावा व त्यानंतर प्रस्ताव विचारार्थ ठेवावा हा प्रस्ताव नामंजूर करण्यात येतो.

**ठराव** :

सभागृहात झालेल्या चर्चे नुसार प्रस्तुत प्रस्ताव नांमजुर करण्यात येतो.

**विषय क्र. ४८४** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौजे कांचनवाडी येथील गट नंबर ४,५,६,७,८,६३,६६ व ६७ तसेच गोलवाडी गट क्र. ४२ व ४३ अशी एकुण ५४ एकर जमीन ड्रेनेज ट्रीमेंट प्लॅन्ट व कर्मचाऱ्यांची निवासस्थाने या करीता विकसीत असुन मंजुर विकास योजना (वा.ह.) मध्ये हा अस्तित्वातील वापर म्हणुन हया जमिनीचा वापर दर्शविला आहे.

सदर जागा पैठण रोड लगत असुन परिसराच्या विकास व सद्याची त्या भागातील मागणी पाहता सदर जागेची विकास क्षमता चांगली आहे. मनपा उत्पन्नाचा कायमस्वरुपी आर्थिक / उत्पन्नाचा स्त्रोत स्थापित करणेकरीता सदर जागा व्यावसायीक वापराकरीता विकसीत करणे उचित ठरणार आहे.

मंजुर विकास योजना मधील दर्शविलेल्या वापरामुळे मनपास प्रस्तावित वापरांसाठी जमिन विकास शक्य नाही. सबब हया जमिनीचे वापरात बदल करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक ठरते. तथापी मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद च्या समोर याचिका ५७३० / २००७ प्रमाणे किरकोळ फेरबदलास स्थगिती आहे, त्यामुळे व सद्या सदर मंजुर विकास योजना सुधारीत करण्याची कार्यवाही होत आहे. मात्र मंजुर विकास योजना सुधारीत करण्याचे कार्यवाहीस लागणारा अवधी व मनपाची सदर जमीन विकासाची निकड याचा एकत्रित विचार करता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सदर प्रस्ताव मंजुरी नंतर इतर कार्यालयीन व मा.उच्च न्यायालयाची परवानगी घेवुन किरकोळ फेरबदलाची कार्यवाही करण्यांत येईल. कार्यवाहीसह या अनुषंगाने करावयाचे पुढील कार्यवाही संबंधाने सर्व अधिकार आयुक्त यांना देण्यात यावेत.

तसेच रेल्वेस्टेशन येथील रस्त्यासाठी सेल्स टॅक्स विभागाची जमिन ताब्यात घेण्यात आली होती व त्या बदल्यात वेदांतनगर येथील रेखंकनातील जागा सेल्स टॅक्स विभागास देण्यात आली होती. वेदांतनगर येथील जागा नियमाप्रमाणे देय नसल्याने रद्द करण्यात आली त्याऐवजी उपरोक्त कांचनवाडी येथील उपरोक्त जागेपैकी पैठणरोडच्या लगत २०००० चौ.फुट जागा सेल्स टॅक्स विभागाला त्यांचे जागेऐवजी देण्याचे प्रस्तावित करण्यांत येत आहे. मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री.प्रफुल्ल मालानी :हा विषय न्यायप्रविष्ठ असल्याने न्यायालयासमोर याची बाजू मांडवी नंतर हा विषय यावा.

यावेळी अनेक स.सदस्य डायस समोर मोठमोठयाने एकाच वेळी बोलत असतात.राजदंड घेवून जातात.

श्री.संजय केनेकर :जे स.सदस्य राजदंड घेवून जात आहे त्यांचे सभासदत्व रद्य करावे.

श्री.राजू शिंदे :सभागृहात मा.महापौर यांचा अपमान करणा-या स.सदस्यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्य करावे.

मा.महापौर. :सदरील प्रस्ताव दिनांक २९-९-२०११ च्या सभेत ठेवण्या बाबत नगरसचिव यांचेकडे आलेला होता त्यानंतर हा प्रस्ताव आज दिनांक १८-१०-२०११ च्या सभेत ठेवण्यात आला सन २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १२ आणि सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्र ३२ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुचि ड प्रकरण २ मध्ये नवीन नियम एक (स) दाखल करण्यात आले असून त्यानुसार महापालिकेच्या मंजुरीसाठी प्रस्ताव नगरसचिव यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर लगतच घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत असा प्रस्ताव निकालात काढणे आवश्यक आहे जर तसे न केल्यास अशा प्रस्तावाला महापालिकेने मंजूर किंवा मान्यता दिली असल्याचे म्हणण्यात येईल या प्रमाणे तरतुदीच्या अधिन राहून हा प्रस्ताव कार्यक्रम पत्रिकेवर घेण्यात आलेला आहे.सध्या महानगरपालिकेच्या विकास योजना आराखडयानुसार कुठलेही आरक्षण बदलण्यास मा. उच्च न्यायालयाची स्थगिती आहे प्रशासनाने सदरील आरक्षण बदलण्याचा प्रस्ताव जो सर्वसाधारण सभेपूढे आहे मंजूर केला तर त्यानंतर मा.उच्च न्यायालयाची परवानगी घेवून कार्यवाही करू असे म्हटले आहे. सभागृहातील भावना लक्षात घेता झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रशासनाला आदेशीत करण्यात येते की अशा प्रकारचा प्रस्ताव ठेवतांना अगोदर मा.उच्च न्यायालयाची परवानगी घ्यावी त्यानंतरच प्रस्ताव विचारार्थ ठेवावा म्हणजे मा. न्यायालयाचा अवमान होणार नाही याची दखल घ्यावी तसेच रेल्वेस्टेशन येथील महापालिकेने सेल्स टॅक्स विभागाची जी जमिन ताब्यात घेतली त्याचे मोबदल्यात याच ५४ एकर मधील २०००० चौ.फुट देणे बाबत प्रस्तावित केले त्या बाबत पुर्नविचार करून महापालिकेच्या क्षेत्रातील मालकीची जागा देणे बाबत कार्यवाही करावी हा प्रस्ताव स्थगित करण्यात येतो.

**ठराव** :

सभागृहात झालेल्या चर्चे नुसार प्रस्तुत प्रस्तावास तुर्त स्थगिती देण्यात आली.

**विषय क्र. ४८५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भाऊ -दिदि प्रकल्प अंतर्गत मिसारवाडी वार्डाचे सर्वेक्षण केले असता तेथे ४३ मुले व ७९ मुली असे एकुण १२२ बालके (६ ते ४ वयोगटातील) शाळाबाहय आढळली. मिसारवाडी वार्डापासुन महानगरपालिका प्राथमिक शाळा नारेगांव व प्राथमिक शाळा सिडको एन-७ या शाळा तीन किलोमीटर दुर असल्याने येथील विद्यार्थी शाळेत जात नाही.

RTE-ACT-२००९ नुसार मिसारवाडी भागात प्राथमिक शाळा तातडीने उघडने गरजेचे आहे. सदरील परिसरात केलेल्या सर्वेनुसार शाळेसाठी इमारत भाडयाने उपलब्ध होऊ शकते.

करिता RTE-ACT-२००९ नुसार मिसारवाडी वार्डात इमारत भाडेने घेऊन शाळा सुरु करण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री.बाळासाहेब मुंडे :हॉल भाडयाने न घेता महापालिकेच्या हॉलमध्ये शाळा सुरू करावी.

मा.महापौर :जर महापालिकेचा हॉल उपलब्ध असेल तर तेथे शाळा सुरू करावी नसता प्रस्तावानुसार कार्यवाही करावी मंजूरी देण्यात येते.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार , RTE-ACT-२००९ नुसार मिसारवाडी वार्डात महानगरपालिकेचा हॉल उपलब्ध असेल तर तेथे शाळा सुरू करावी नसता प्रस्तवानुसार इमारत भाडेने घेऊन शाळा सुरु करण्यास मंजुरी देण्यात येते .वैधनिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८६** :

आयुक्त महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहे की, सिडको परिसरातील जळगांव रस्त्याला समांतर असलेला (Service road) रस्ता हा पूर्वी सिडको मार्फत करण्यात आलेला असून आज स्थितीत सदर रस्त्याची अत्यंत बिकट परिस्थिती झालेली आहे. सदर रस्ता आज स्थितीत ना दुरूस्त झाला असल्याने सिडको भागातील नागरीक हे जळगांव रस्त्यावरून ये-जर करतात. जळगांव रस्त्यावरून होणारी वाहतुक अवजड व गर्दीची असल्याने अनेकदा अपघात होत असतात त्यामुळे सदरचा रस्ता हॉटेल लेमन ट्री पासून ते हर्सुल टी पॉंईट पर्यंत रूंदीकरण करून डांबरीकरण केल्यास सिडको परिसरातील नागरीकांसाठी सोयीचे होऊन जळगांव रस्त्यावरील वाहतुक या रस्त्यावरून होईल व अपघात होण्याचे टळेल.

करिता सदर कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम यांचे सन २०१०-२०११च्या दरसूची नुसार रक्कम रूपये ३,७२,०७,२७२/- चे तयार करण्यात आलेले असून त्यास मंजूरीसह तरतूद उपलब्ध करून देण्यास्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात येत आहे.

तथापी उपरोक्त प्रमाणे कामाची निकड बघता कामासाठीचे रक्कम रूपये ३,७२,०७,२७२/-चे अंदाजपत्रकास मंजूरीसह तरतूद उपलब्ध करून देण्याच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :शहरातील प्रस्तावित नवीन रस्त्याच्या प्रस्तावा सोबत हा एकत्रिक करून प्रस्ताव ठेवावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव हा शहरातील प्रस्तावित नवीन रस्त्याच्या प्रस्तावा सोबत एकत्रित करून प्रस्ताव ठेवण्यास मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका मनपा अर्थसंकल्प २०११-१२ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी फुटकळ कामे करण्याकरीता बदलण्यांत यावा. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. व अ.क्र. | २०११-१२ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|
| Ward E- New work ४५ S.No.१३ | वार्ड क्र.८२ अंतर्गत राजमाता जिजाऊ गृहनिर्माण संस्था येथे गटार बांधणे रक्कम रुपये ०५.०० लक्ष | वार्ड क्र.८२ अंतर्गत फुटकळ |

सुचक : श्री.दिग्विजय स.शेरखाने अनुमोदक :श्री.सुर्यकांत जायभाये

**ठराव.:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८२ मधील सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पात खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजूरी देण्यात येते.

| पान क्र. व अ.क्र. | २०११-१२ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|
| Ward E- New work ४५ S.No.१३ | वार्ड क्र.८२ अंतर्गत राजमाता जिजाऊ गृहनिर्माण संस्था येथे गटार बांधणे रक्कम रुपये ०५.०० लक्ष | वार्ड क्र.८२ अंतर्गत फुटकळ |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४८८:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.०३ यादवनगर अंतर्गत सेक्टर इ मध्ये रस्त्याचे कॉक्रेटींग करणे आवश्यक आहे. या कामासाठी अंदाजपत्रकीय र.रु. ४० लाख आवश्यक आहेत. परंतु त्यासाठी निधी कमी पडत आहे.

करिता सन २०११-२०१२ च्या प्रशासकीय अर्थसंकल्पातील वार्ड ब पान क्र.१७ मधील भांडवली कामे जलनि:सारण व पाणी पुरवठा अ.नु.क्र २/३ वरील २० लाख रुपये वरील कामासाठी वळती करुन घेण्यात यावेत. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री. राजगौरव वानखेडे अनुमोदक : श्री.नारायण कुचे

**ठराव.:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.०३ यादवनगर मधील सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पात वार्ड ब पान क्र.१७ भांडवली कामे जलनि:सारण व पाणीपुरवठा अ.क्र.२/३ वरील २० लाख रूपये प्रभाग क्र.०३ यादवनगर अंतर्गत सेक्टर इ मध्ये रस्त्याचे कॉक्रेटींग करणे या कामास वळती करून घेण्यास मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४८९:**

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, सिडको एन-७,एन-८,एन-५,एन-६ ला जोडणाऱ्या चौकास बजरंग चौक असे नामकरण करुन सदरील चौकास बजरंग चौक असे नांव देण्यासाठी वारंवार मागणी करीत आहे. नागरीकांची मागणी लक्षात घेता या चौकास बजरंग चौक असे नामकरण करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :सौ.प्राजक्ता भाले अनुमोदक :श्री.किशोन नागरे,श्री.विरभद्र गादगे,श्री.सुर्यकांत जायभाये

**<u>ठराव</u> :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-७,एन-८,एन-५,एन-६ ला जोडणाऱ्या चौकास बजरंग चौक असे नांव देण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.४९०:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, वार्ड क्र.५९ खोकडपुरा, अजबनगर येथील विकास कामासाठी अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असुन खालील प्रस्तावित कामा ऐवजी सुधारीत काम करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| प्रस्तावित विकास काम | सुधारीत काम |
|---|---|
| १. वार्ड क्र.५९ विविध ठिकाणी गटार दुरुस्ती व ढापे टाकणे या कामासाठी अर्थसंकल्प पान क्र. जीबीआर-डह-३ अ.क्र.४ वर १०.०० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | १.विविध ठिकाणी इटालियन पेव्हर ब्लॉक बसविण- ५ लक्ष.<br>२.विविध ठिकाणी गटार दुरुस्ती व ढापे टाकणे- २.५० लक्ष.<br>३.विविध ठिकाणचे खराब पोल व केबल बदलणे-२.५० लक्ष |

सुचक :सौ.सुनिता सोनवणे अनुमोदक :श्री.अशोक बेहडे

**<u>ठराव.:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५९ खोकडपुरा, अजबनगर येथील अर्थसंकल्पातील खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजूरी देण्यात येते.

| प्रस्तावित विकास काम | सुधारीत काम |
|---|---|
| १. वार्ड क्र.५९ विविध ठिकाणी गटार दुरुस्ती व ढापे टाकणे या कामासाठी अर्थसंकल्प पान क्र. जीबीआर-डह-३ अ.क्र.४ वर १०.०० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | १.विविध ठिकाणी इटालियन पेव्हर ब्लॉक बसविण- ५ लक्ष.<br>२.विविध ठिकाणी गटार दुरुस्ती व ढापे टाकणे- २.५० लक्ष.<br>३.विविध ठिकाणचे खराब पोल व केबल बदलणे-२.५० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९१** :

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, श्रीमती परिगाबाई तुकाराम दाभाडे, हया बडीगिरणी येथील प्रा.शा. येथे बालवाडी शिक्षिका म्हणुन रुपये ९००/- मानधनावर कार्यरत आहे. त्यांची मुलगी कु.सुशिला वय १६ वर्ष हिस हृदयाचा ठिकाणी पाणी झाल्यामुळे सहारा हॉस्पीटल, रोशनगेट, औरंगाबाद येथे उपचार चालु आहे. डॉ.मोहसीन आबेदी यांच्या प्रमाणपत्रा आधारे उपचारार्थ एकुण १,२०,०००/- एवढा खर्च अपेक्षीत आहे. श्रीमती परिगाबाई तुकाराम दाभाडे हया शाळे व्यतिरिक्त धुणीभांडी करीत असुन त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे.

करीता त्यांनी विनंती अर्ज देवुन कळविले आहे की, सहारा हॉस्पीटल, रोशनगेट औरंगाबाद येथे मुलीच्या कु.सुशिला हिच्या उपचारार्थ व शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत रक्कम रु. १.२० लक्ष मनपाने देण्यासाठीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे

अनुमोदक :श्री.मिर हिदायत अली, श्री.काशिनाथ कोकाटे, श्री.संजय केनेकर, सौ.पुष्पा सलामपुरे, श्री.नागरे किशोर

मा.महापौर : नियमाने कार्यवाही करावी.विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमती परिगाबाई तुकाराम दाभाडे, यांची मुलगी कु.सुशिला तुकाराम दाभाडे, वय १६ वर्ष हिच्या हृदयाचा उपचारार्थ व शस्त्रक्रियेसाठी रूपये १.२० लक्ष खर्च अपेक्षित आहे. तरी उपचारार्थ व शस्त्रक्रियेसाठी नियमाप्रमाणे आर्थिक मदत देण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९२** :

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, शहरामध्ये मनपाच्या वतीने अनुसूचित जाती जमातीच्या दारिद्र्यरेषेखालील नागरीकांसाठी राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजनेसाठी नव्याने सर्व्हे करुन प्रत्येक लाभार्थीला न्याय देण्याकरीता नव्याने सर्व्हे करावा, यामधील जाचक अटी शिथील करण्याबाबत शासनाकडे विनंती व पाठपुरावा करावा या मागणीसाठी स.सदस्य श्री.कृष्णा बनकर यांना उपोषण करावे लागले. मनपा प्रशासनाकडे श्री.कृष्णा बनकर यांनी सर्व गरजु लाभार्थीनी सहभागी करुन घेण्यासाठी योग्य पध्दतीने सर्व्हे करण्याची वारंवार मागणी केली होती. परंतु त्याकडे गांर्भीयाने न पाहिल्यामुळे स.सदस्यांना उपोषणाचा मार्ग अवलंबावा लागला. मा.महापौर व स.पदाधिकारी यांनी उपोषणाच्या अनुषंगाने व्यापक दृष्टीकोन डोळयासमोर ठेवून ही योजना राबविण्यात येईल असे आश्वासन दिलेले आहे.

या संदर्भात स.सदस्यांचे मागणी प्रमाणे शहरातील दारिद्र्यरेषेखालील सर्व गरजु लाभार्थींना घरकुल योजनेचा लाभ मिळावा यासाठी नव्याने सर्व्हे करुन लाभार्थी निश्चित करावे व यातील जाचक अटी शिथील करण्यासाठी शासनाकडे विनंती आणि पाठपुरावा करण्यात यावा.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : सभापती स्थायी समिती श्री.राजू रामराव शिंदे

अनुमोदक :श्री.काशिनाथ कोकाटे, श्री. समिर राजुरकर, श्री.हिदायत अली

मा.महापौर :शासन निर्देशानुसार घोषित झोपडपट्टीतील दारिद्रय रेषेखालील अनुसुचित जाती व व नवबौध्द कुटूंबाची पात्र लाभार्थी म्हणून प्रथम ४५४ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.सर्वेक्षणाचे काम प्रगतीपथावर असून भविष्यामध्ये आणखी पात्र लाभार्थ्यांची निवड होणे अपेक्षीत आहे या संदर्भात स.सदस्य श्री. कृष्णा बनकर हे उपोषणास बसले होते तसेच या योजनेतील जाचक अटी शिथील करण्याकरीता व नव्याने सर्वेक्षणाचे काम करण्यासाठी शासनाकडे विनंती व पाठपुरावा करण्यात यावा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील दारिद्र्यरेषेखालील सर्व गरजु लाभार्थींना घरकुल योजनेचा लाभ मिळावा यासाठी नव्याने सर्व्हे करुन लाभार्थी निश्चित करणेस व यातील जाचक अटी शिथील करण्यासाठी शासनाकडे विनंती आणि पाठपुरावा करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९३** :

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, हैद्राबात येथील हुसेन सागर येथे ज्या पध्दतीचे तथागत भगवान बुध्दाची पुर्णाकृती मुर्ती बसविण्यात आली आहे त्या धर्ती आधारे औरंगाबाद

शहर हे ऐतिहासिक शहर असून या शहरामध्ये बिबी-का-मकबरा, पाणचक्की, बौध्द लेणी, अजिंठा, वेरूळ लेणी ही ऐतिहासिक स्थळे बघण्यासाठी बाहेर देश विदेशातून पर्यटकांचा वावर जास्त आहे.

करीता हैद्राबाद धर्ती आधारे हुसैनसागरमध्ये ज्या पध्दतीची भगवान गौतम बुध्दाची मुर्ती आहे तशीच सलीम अली सरोवरामध्ये भगवान गौतम बुध्दाची मुर्ती बसविण्यात यावी व परिसराचे सुशोभिकरण करण्यात यावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.सुरेश इंगळे

अनुमोदक श्री.आनंद घोडेले , श्री.रामदास बोराडे

संवाद :

श्री.संजय केनेकर :सदर ठिकाणी ड्रेनेजचे पाणी येते पुतळा कसा बसविणार.

श्री.मीर हिदायत अली :प्रशासकीय प्रस्ताव यावा.

मा.महापौर :रितसर प्रशासकीय प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे यावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चे नुसार प्रस्तुत प्रस्ताव रितसर प्रशासनामार्फत ठेवण्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ४९४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद जिल्हा पॅरालिम्पिक असोसिएशनच्या वतीने अंध,अपंग व मतीमंद खेळाडुंची राज्यस्तरीय जलतरण अजिंक्यपद स्पर्धा दिनांक २२,२३ ऑक्टोबर २०११ रोजी शहरात आयोजित करण्यात येणार आहे.

तसेच स्पर्धेला लागणारा खर्च अंदाजे १.००लक्षास मंजुरी देण्यात यावी.

सुचक :श्री.गिरजाराम हाळनोर , श्री.हुशारसिंग चव्हाण

अनुमोदक:श्री.मिर हिदायत अली, श्री.काशीनाथ कोकाटे, श्री.संजय केनेकर,
सौ.प्राजक्ता मंगेश भाले, श्री.विरभद्र गादगे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे औरंगाबाद जिल्हा पॅरालिम्पिक असोसिएशनच्या वतीने अंध,अपंग व मतीमंद खेळाडुंची राज्यस्तरीय जलतरण अजिंक्यपद स्पर्धा दिनांक २२,२३ ऑक्टोबर २०११ रोजी शहरात आयोजित करण्यात येत असुन या स्पर्धेला लागणारा अंदाजीत १.००लक्ष खर्चास नियमानुसार मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४९५:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२२ नारेगांव येथील जय तुळजाभवानी चौक ते ट्रेचिंगग्राऊंड , वरूड ते शेंदरा एम.आय.डी.सी.कडे जाणारा मुख्य रस्ता हा ३० मीटर रूंदचा डेव्हलपमेंट प्लॅनमध्य ठेवण्यात आलेला आहे. सद्या या रस्त्यावर वाहनाची जास्त वर्दळ होत आहे. महानगरपालिकेची हद्द ट्रेचिंगग्राऊंड पर्यंत आहे. या रस्त्यावर नारेगांव लगत मुख्य रस्त्याच्या बाजुला अतिक्रमण झाल्यामुळे हा रस्ता छोटा अरूंद झालेला आहे. त्यामुळे वाहनाची कोंडी होत आहे. जय तुळजाभवानी चौक ते ट्रेचिंगग्राऊंड पर्यत ३० मीटर रूंद रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात यावे कारण ट्रेचिंगग्राऊची पहाणी करण्यासाठी व कच-याची व्हीलेवाट लावण्यासाठी परदेशातील संशोधक व आयुक्त आणि अधिकारी सतत भेटी देण्यासाठी येतात सद्याची परिस्थिती व भविष्यामधील परिस्थिती लक्षत घेता हा रस्ता ३० मिटर खुला करून

चौपदरी करणे अत्यंत आवश्यक आहे करीता सदरील ३० मिटर रस्त्यावरील अतिक्रमण काढुन चौपदरी रस्ता तयार करण्याचे काम लवकरात लवकर हाती घेण्याचा प्रस्ताव मा सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर

सुचक : श्री मनिष दहीहंडे                    अनुमोदक : श्री.त्रिंबक गणपतराव तुपे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२२ नारेगांव येथील जय तुळजाभवानी चौक ते ट्रेचिंगग्राऊंड, वरूड ते शेंदरा एम.आय.डी.सी.कडे जाणाऱ्या ३० मीटर मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यास व सदरील रस्ता चौपदरी करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४९६:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र. १० जयसींगपुरा येथील विकास कामासाठी अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आली होती. त्यानुसार खालील कामाचे दि.१७.०२.२०११च्या सर्वसाधारण सभेमध्ये लेखाशिर्ष बदलण्यत आले होते. विषय क्रमांक २५८

प्रस्तावित विकास काम:-

अर्थसंकल्प पान क्र.एस.सी.आर.ए.४ अ.क्र.१ वार्ड क्र.१० जयसिंगपुरा येथील खाजा भाई गल्ली व कुंभार गल्ली येथे जलवाहीनी टाकणे - ७ लक्ष

सुधारित विकास काम -

अर्थसंकल्प पान क्र. एस.सी.आर.ए.४ अ.क्र.१ वार्ड क्र. १० जयसींगपुरा येथे विविध ठिकाणी कॉंक्रीट करणे - ७ लक्ष

सुचक : श्री.अशोक किसनराव बेहडे                    अनुमोदक : श्री.मिलींद दाभाडे

**ठराव.:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१० जयसिंगपुरा येथील विकास कामासाठी अर्थसंकल्पातील खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजूरी देण्यात येते.

प्रस्तावित विकास काम:-

अर्थसंकल्प पान क्र.एस.सी.आर.ए.४ अ.क्र.१ वार्ड क्र.१० जयसिंगपुरा येथील खाजा भाई गल्ली व कुंभार गल्ली येथे जलवाहीनी टाकणे - ७ लक्ष

सुधारित विकास काम -

अर्थसंकल्प पान क्र. एस.सी.आर.ए.४ अ.क्र.१ वार्ड क्र. १० जयसींगपुरा येथे विविध ठिकाणी कॉंक्रीट करणे - ७ लक्ष वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४९७:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र. ८० मध्ये अंतर्गत कॉंक्रेटींग करण्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसकल्पात एस आर ई -३ मध्ये रक्कम रूपये १० लक्ष तरतुद करण्यात आली आहे. त्यापैकी रक्कम रू.६.०० लक्ष खर्च झाली असुन उर्वरीत रक्कम रूपये ४.००लक्ष शिल्लक आहे या रक्कम रूपय ४.०० मधुन प्रभाग क्र. ८० अंबीकानगर मध्ये गटार व त्यावर लोखंडी जाळी बसविण्यात यावी. करीता लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.कमलताई नरोटे                    अनुमोदक : श्री.नारायण कुचे

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. ८० मधील सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यांत येते,

प्रभाग क्र. ८० मध्ये अंतर्गत कॉंक्रेटींग करण्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसकल्पात एस आर ई -३ मध्ये रक्कम रूपये १० लक्ष तरतुद करण्यात आली आहे. त्यापैकी रक्कम रू.६.०० लक्ष खर्च झाली असुन उर्वरीत रक्कम रूपये ४.००लक्ष शिल्लक आहे या रक्कम रूपय ४.०० मधुन प्रभाग क्र. ८० अंबीकानगर मध्ये गटार व त्यावर लोखंडी जाळी बसविण्यास मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४९८:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पुंडलिकनगर येथील जेष्ठ समाजसेवक स्व.पुंडलिक निवृत्ती राऊत यांचे या भागातील कार्य न विसरण्यासारखे आहे. असे कार्य करीत असतांनाच त्यांना वीरमरण आले होते. त्यांची पुण्यतिथी/जयंती सर्व नागरीक दरवर्षी मोठया उत्सहाने साजरी करतात.

अशा समाजसेवकाचा स्मृती स्तंभ महानगरपालिकेच्या माध्यमातुन पुंडलिकनगर येथे उभार करण्यात आलेला आहे. त्याच ठिकाणी त्यांचा अर्धाकृती पुतळा उभारण्यात यावा अशी जनतेची भावना आहे.

करीता महानगरपालिकेच्या वतीने स्व.पुंडलिक राऊत यांच्या स्मृती स्थानाजवळ त्यांचा अर्धाकृती पुतळा उभारण्यात यावा.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक: श्री.सुर्यकांत जायभाये

अनुमोदक: श्री.त्रिंबक गणपतराव तुपे,श्री.दिग्विजय शेरखाने, श्री.विजेंद्र जाधव

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुंडलिकनगर येथील जेष्ठ समाजसेवक स्व.पुंडलिक निवृत्ती राऊत यांच्या स्मृती स्थानाजवळ सदरील चौकाचे नुतणीकरण करण्यास व त्यांचा अर्धाकृती पुतळा उभारण्यास मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मनपामध्ये आरसीएच लिंकवर्कर ९० असून सुपरवायझर्स ६ आहेत. त्यांना केंद्र शासनातर्फे ५००/- रूपये मानधन देण्यात येत असून मनपातर्फे १२५०/- रू मानधन देण्यात येते सदरील मानधन गेल्या २००२ पासूनची असून आजपर्यंत वाढ करण्यात आलेली नाही. आरसीएच प्रकल्पातंर्गत घरोघरी जावुन माता बालकांचे अन्य आरोग्य विषयक कामासाठी व सर्वेक्षण करण्यासाठी वरील मानधनावर लिंक वर्कर्सची नियुक्ती करण्यात आली होती, परंतु त्यांचे कामाचे स्वरूप कामाची व्याप्ती व कामाचा कालावधी हे विचारात घेता त्यांना देण्यात येणारे मानधन खुप कमी व तोकड्या स्वरूपाचे आहे. त्यांच्या कामाच्या कालावधीनुसार लिंकवर्कर यांना १०००/- रू व सुपरवायझर्स यांना १५००/- अशी मानधनात वाढ करण्याच्या प्रस्तावास विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.गजानन रामकिसन बारवाल, श्री.किशोर नागरे, श्री.रेणुकादास (राजु) वैद्य

अनुमोदक : सौ.सुनिता बरथुने, श्री.बन्सी जाधव, श्री.सुशिल खेडकर

**संवाद :**

श्री.संजय केनेकर :दै. वेतनावरील कर्मचारी यांचा दै.वेतन अगोदर वाढविण्यात यावा.त्यानंतर हे करावे.

मा.महापौर :सरसकट ५००/- रु. ची वाढ करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपामध्ये आरसीएच लिंकवर्केरर्स व सुपरवायझर्स यांना प्रस्तावात नमुद कामासाठी त्यांचे मानधन सरसकट रु. ५००/- वाढ करण्यास मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५००** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका मनपा अर्थसंकल्प २०१०-११ वार्ड क्रं.३५, मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यांत यावा, म्हणुन प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| पान क्रं. व अ.क्र. | २०११-१२ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|
| Ward A New Work GBR-A-२ Sr.No. ०७ | वार्ड क्रं ३५ विविध इमारती दुरूस्ती करणे रक्कम रूपये ०५ लक्ष | सदरील मंजुर तरतुदी रूपये ०५ लक्षापैकी रूपये २.६ लक्ष रूपये वार्ड क्रं.३५ मध्ये विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी वळती करणे. |

सुचकः- श्री.विजेंद्र जाधव अनुमोदकः-श्री.प्रमोद राठोड, सौ.किर्ती शिंदे

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्पातील वार्ड क्रं.३५, मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रं. व अ.क्र. | २०११-१२ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|
| Ward A New Work GBR-A-२ Sr.No. ०७ | वार्ड क्रं ३५ विविध इमारती दुरूस्ती करणे रक्कम रूपये ०५ लक्ष | सदरील मंजुर तरतुदी रूपये ०५ लक्षापैकी रूपये २.६ लक्ष रूपये वार्ड क्रं.३५ मध्ये विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी वळती करणे. |

वैधनिक कार्यवाही व्हावी

**विषय क्र. ५०१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रिट पिटीशन क्र.१९६/२००१ नुसार मा.सर्वोच्च न्ययलयाने एक लक्ष लोकसंख्येमागे एक रात्र निवारागृह उभे करण्याचे आदेशित केले असुन एक रात्र निवारा गृहात १०० बेघर व्यक्तींची व्यवस्था होऊ शकते. यासाठी बेघर लोकांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई-३२ दिनांक ३१.०५.२०११च्या पत्रकान्वये औरंगाबाद महानगरपालिकेत एकुण ०९ एक रात्र निवारा गृह सुरू करण्याचे निर्देश दिलेले आहे. त्यासाठी वृत्तपत्रात जाहीर निवेदन देऊन स्थानिक स्वयंसेवी संस्थेकडुन सदर एक रात्र निवारागृह चालविण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात आले. एकुण ०८ स्वयंसेवी संस्थांनी प्रस्ताव सादर केले आहे. त्यांची नांवे या प्रमाणे आहे.

१. इमॅन्युअल मिनीस्ट्रीज
२. मराठवाडा ग्रामीण विकास संस्था
३. जिवन जागृती वैद्यकीय व सामाजिक संस्था
४. तिरूमला शिक्षण प्रशिक्षण मंडळ
५. सम्राट अशोक बहुउद्देशिय संस्था
६. प्रज्ञा महिला सुशिक्षित बेरोजगार संस्था

७. अंकुर बहुउद्देशिय सेवाभावी संस्था

८. स्व.लक्ष्मीदेवी बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, औरंगाबाद.

गठीत समितीद्वारे ०१ ते ०४ या स्वयंसेवी संस्थांना पात्र ठरविण्यात आले. नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक MIS-२०११/CR/४५/४D/ दिनांक २२.०९.२०११ अन्वये रात्र निवारा गृह कार्यान्वीत करण्यासाठी सुरवात करण्यासंबंधीची कार्यवाही दिनांक ३१.१०.२०११ पुर्वी करणे आवश्यक आहे. (सोबत परिपत्रक प्रत संलग्न)

करीता मान्यतेस्तव तसेच रात्र निवारा गृहसंबंधीत नियमीत कार्यवाहीचे सर्व अधिकार आयुक्त, यांना प्रदान करणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :रात्रनिवारा करण्या बाबतचा विषय व ऐनवेळचे सर्व विषय मंजूर करण्यात येते.

**ठराव. :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रिट पिटीशन क्र.१९६/२००१ नुसार मा.सर्वोच्च न्ययलयाने एक लक्ष लोकसंख्येमागे एक रात्र निवारागृह उभे करण्याचे आदेशित केले असुन एक रात्र निवारा गृहात १०० बेघर व्यक्तींची व्यवस्था होऊ शकते. यासाठी बेघर लोकांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांचे दिनांक ३१.०५.२०११च्या पत्रकान्वये औरंगाबाद महानगरपालिकेत एकुण ०९ एक रात्र निवारा गृह सुरू करण्याचे निर्देश दिलेले आहे त्यानुसार गठीत समितीद्वारे ०१ ते ०४ या स्वयंसेवी संस्थांना पात्र ठरविण्यात आले असुन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक MIS-२०११/CR/४५/४D/ दिनांक २२.०९.२०११ अन्वये दिनांक ३१.१०.२०११ पूर्वी रात्र निवारा गृह कार्यान्वीत करण्यास व या संबधीचे नियमित कार्यवाहीचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०२ :**

सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात येतो, दिनांक १८.०१.२०११ रोजी मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. प्रस्ताव सादर करतांना काही आकडेवारीत नजरचुकीने बदल झालेला आहे, त्यामुळे दाखल केलेला प्रस्तावात खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

औरंगाबाद शहरातील बाराव्या वित्त आयोगा अंतर्गत वार्ड अ व ड मधील विविध रस्त्यांचे मजबुतीकरण व पुर्नडांबरीकरण करणे या कामाची सार्वजनिक बांधकाम जिल्हा दरसूची २००८-०९ नुसार रक्कम रूपये २,६४,४२,९९६/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता ठराव क्रमांक ८५७ दिनांक २१-१२-२००९ नुसार प्राप्त आहे या कामात महावीर चौक ते रेल्वेस्टेशन या रस्त्याच्या कामाचा यात समावेश आहे सदर रस्ता हा शहराचा मुख्य रस्ता तसेच बायपास रस्त्यास जोडणारा एकमेव रस्ता असून या रस्त्यावर (मल्टी एक्सल १२० टनापर्यंतची वाहने )रहदारी अहोरात्र सुरू असते. अतिवृष्टीमुळे सदर रस्ता बहुतांश भागात पूर्णतः खचला होता त्या कारणामुळे हा रस्ता नॉन मोटोरेबल स्थितीत होता.

या रस्त्याची बांधणी तांत्रिकदृष्टया योग्य करणे अत्यंत आवश्यक होते सदरील रस्त्याचे काम प्रत्यक्ष हाती घेतले असता मूळ कामाच्या अंदाजपत्रकातील बाबी व्यतिरिक्त इतर आवश्यक अतिरिक्त बाबींचा तांत्रिकदृष्टीया समावेश करणे गरजेचे असल्याने या कामाच्या मुळ अंदाजपत्रकात वाढ झाली आहे. सदर वाढीव रू.४५.०० लक्ष रक्कमेची तरतूद बाराव्या वित्त आयोगांतर्गत वर प्रस्तावित सर्वसाधारण सभ्ेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकातून जी कामे अद्याप

सुरू झालेली नाही व पुढेही कामे होण्याची शक्यता वाटत नाही त्या कामाची प्रशासनाकडून तपासणी होऊन महावीर चौक ते रेल्वेस्टेशन रस्त्याच्या कामासाठी रू. ४५.०० लक्ष वळती करण्याच्या प्रस्ताव व वाढीव अंदाजपत्रकास मान्यता देणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे शहरातील बाराव्या वित्त आयोगा अंतर्गत वार्ड अ व ड मधील विविध रस्त्यांचे मजबुतीकरण व पुर्नडांबरीकरण करणे या कामाची सार्वजनिक बांधकाम जिल्हा दरसूची २००८-०९ नुसार रक्कम रूपये २,६४,४२,९९६/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेल्यामध्ये महावीर चौक ते रेल्वेस्टेशन या रस्त्याच्या कामाचा यात समावेश असून या रस्त्याची बांधणी तांत्रिकदृष्टया योग्य करणे अत्यंत आवश्यक असून सदरील रस्त्याचे काम प्रत्यक्ष हाती घेतले असता मूळ कामाच्या अंदाजपत्रकातील बाबी व्यतिरिक्त इतर आवश्यक अतिरिक्त बाबींचा तांत्रिकदृष्टीया समावेश करणे गरजेचे असल्याने या कामाच्या मुळ अंदाजपत्रकात प्रस्तावित रू.४५ लक्ष रक्कमेची वाढीव तरतूद १२ व्या वित्त आयोगा अंतर्गत प्रस्तावात नमुद सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या एकत्रित अंदाजपत्रकातून जी कामे अद्याप सुरू झालेली नाही व पुढेही कामे होण्याची शक्यता वाटत नाही त्या कामाची प्रशासनाकडून तपासणी होऊनच महावीर चौक ते रेल्वेस्टेशन रस्त्याच्या कामासाठी रू. ४५ लक्ष वळती करण्यास व वाढीव अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. :- ५०३**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात उघडयावर शौचविधी करण्यापासून नागरीकांना परावृत्त करणे व शहर हागणदारी मुक्त करणे संदर्भाने महाराष्ट्र राज्याचे मा. सचिव, यांनी अ.शा.पत्र क्रं/नगरो/२०११/प्र.क्रं ३१/नवि ३३ नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई दिनांक २९ जानेवारी २०११ नुसार कार्यवाही प्रस्तावित करणे बाबत औरंगाबाद महानगरपालिकेस सुचना केलेली आहे.

तसेच महाराष्ट्र भुजल व निर्मल अभियान अंतर्गत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे शासन निर्णय क्रमांक सुनिअ-२०१० प्र.क्र र. १३२/पापु-२२ दिनांक १९ जुन २०१० नुसार शहर स्वच्छता सुविधांचे सार्वत्रिकरण करण्यासाठी नागरी संस्थानी करावयाच्या उपाययोजना अंतर्गत ही शहर हागणदारी मुक्त करणे असल्याने शहरातील शाळा, विद्यालये,दवाखाने,विविध केंद्र व राज्य शासकीय आणि निमशासकीय कार्यालयामध्ये तसेच शहरामध्ये असलेले कारखाने, उद्योग, वाणिज्यिक संस्था अंतर्गत असलेल्या स्वच्छतागृहांची उपलब्धता व व्यवस्थापनाबाबत संबंधिताशी समन्वय करुन तसेच आवश्यक त्या ठिकाणी सुलभ शौचालये बांधुन या सेवांबाबत पाठपुरावा करण्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने योजीलेले आहे. जेणेकरुन संपूर्ण शहर हागणदारी मुक्त करणे बाबत शासनाची असलेली संकल्पाना पुर्णत्वास नेता येणार आहे.

तदनुसार शहरात विविध ठिकाणी सुलभ शौचालये बांधणेच्या कार्यक्रमाअंतर्गत सुलभ शौचालये बांधण्याचे व नियमित चालविण्याचे काम करणाऱ्या आधार फाऊंडेशन, मुंबई या संस्थे मार्फत शहरातील खालील भागात बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या तत्वावर महिला व पुरुषांसाठी सुलभ शौचालय बांधण्याचा प्रस्ताव औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे.

- पुंडलीकनगर ८० फुटी डी.पी.रस्त्यावर मलकापुर अर्बन बँकेजवळील नाल्यावर.

- मध्यवर्ती जकात नाका परिसरात (डॉग हाऊस लगत)

वरील प्रस्तावित सुलभ शौचालय हे आधार फाऊंडेशन मुंबई यांचे मार्फत बांधण्यात येवून सुलभ शौचालयाची नियमित देखभाल दुरुस्ती होणे साठी पे ॲण्ड युज पध्दतीवर राबविण्याचे प्रस्तावित असुन होणाऱ्या नियमित उत्पन्नातून सदर संस्था त्यांचा आस्थापना खर्च, पाणी पुरवठा खर्च, विद्युत खर्च व नियमित (स्थापत्य व इतर आवश्यक) देखभाल दुरुस्तीचा खर्च करणार आहे.

वरील दोन्ही ठिकाणी प्रस्तावित सुलभ शौचालयाचे बांधकाम हे बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या तत्वावर असल्याने औरंगाबाद महानगरपालिकेस कोणताही आर्थिक खर्च करावा लागणार नसल्याने संबंधित संस्थेस वरील ठिकाणची जागा ही सुलभ शौचालय बांधणे करीता महानगरपालिकेच्या विहीत अटी व शर्ती नुसार ३० वर्षासाठी देण्याचे प्रस्तावित आहे.

करीता वरील नुसारच्या शासन निर्णयानुसार तसेच औरंगाबाद शहर हागणदारी मुक्त होण्याच्या दृष्टीकोनातून शहरात विविध ठिकाणी आवश्यतेनुसार आधार फाऊंडेशन, मुंबई यांच्या मार्फत बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या तत्वावर तसेच पे ॲण्ड युज पध्दतीने महिला व पुरुषासाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या विहित अटी व शर्तीनुसार सुलभ शौचालये बांधण्याचा तसेच सदरील संस्थेत ३० वर्षासाठी शहरातील ज्या ज्या ठिकाणी शौचालयासाठी जागा उपलब्ध होणार आहे ती जागा लिजवर देण्याचा तसेच शहरात विविध ठिकाणी सुलभ शौचालये बांधणे बाबत आवश्यक ती कार्यवाही करणे बाबत मा. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना अधिकार प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे औरंगाबाद शहरात उघडयावर शौचविधी करण्यापासून नागरिकांना परावृत्त करणे व शहर हागणदारी मुक्त करणे संदर्भाने महाराष्ट्र राज्याचे मा. सचिव, यांनी अ.शा.पत्र क्रं/नगरो/२०११/प्र.क्रं ३१/नवि ३३ नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई दिनांक २९ जानेवारी २०११ नुसार कार्यवाही प्रस्तावित करणेस केलेल्या सूचना प्रमाणे तसेच महाराष्ट्र भुजल व निर्मल अभियान अंतर्गत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे शासन निर्णय क्रमांक सुनिअ-२०१० प्र.क्र र. १३२/पापु-२२ दिनांक १९ जुन २०१० नुसार शहर स्वच्छता सुविधांचे सार्वत्रिकरण करण्यासाठी नागरी संस्थानी करावयाच्या उपाययोजना अंतर्गत ही शहर हागणदारी मुक्त करणे बाबत शासनाची संकल्पना पुर्णत्वास नेण्यासाठी आधार फाऊंडेशन, मुंबई या संस्थे मार्फत शहरातील खालील भागात बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या तत्वावर महिला व पुरुषांसाठी सुलभ शौचालय बांधण्याचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

- पुंडलीकनगर ८० फुटी डी.पी.रस्त्यावर मलकापुर अर्बन बँकेजवळील नाल्यावर.
- मध्यवर्ती जकात नाका परिसरात (डॉग हाऊस लगत) तसेच शहरात विविध ठिकाणी आवश्यतेनुसार आधार फाऊंडेशन, मुंबई यांच्या मार्फत बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या तत्वावर तसेच पे ॲण्ड युज पध्दतीने महिला व पुरुषासाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या विहित अटी व शर्तीनुसार सुलभ शौचालये बांधण्यास तसेच सदरील संस्थेस शहरातील ज्या

ज्या ठिकाणी शौचालयासाठी जागा उपलब्ध होणार आहे ती जागा ३० वर्षासाठी लिजवर देण्यास तसेच शहरात विविध ठिकाणी सुलभ शौचालये बांधणे बाबत आवश्यक ती कार्यवाही करणेस व या बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगरसचिव
महानगरपालिका औरंगाबाद